नागरिकांबद्दल मला सहानुभूती आहे. त्यांना केवळ हा व्हिसा मिळण्यासाठी पाच देण्याचेही सौजन्य त्यांनी दाखवले नाही, असे ट्वीट सुषमांनी केले.


SANGHVI

## संघवी मूव्हर्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : सर्व्हे क्र.९२, ताथवडे, तालुका मुळशी, पुणे - ४११०३३ महाराष्ट्र
फोन +९१ २० ६६७४ ४७०० फॅक्स +९१ २० ६६७४ ४७२४
ई-मेल : sanghvi@sanghvicranes.com www.sanghvicranes.com
सीआयएन : L29150PN1989PLC054143


### वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना तसेच दूरस्थ ई-मतदानाची व नोंदणी पुस्तके बंदची माहिती

असे सूचित केले जाते कि कंपनीची २८वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक ०९ ऑगस्ट २०१७ रोजी दुपारी ३.३० वाजता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालय सर्व्हे न. ९२, ताथवडे, तालुका मुळशी, पुणे - ४११०३३, येथे आयोजित करण्यात आली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि स्पष्टीकरण निवेदनासहित हे कंपनीच्या सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठविण्यात आले आहे. मतदानाचा अधिकार असणाऱ्या कंपनीच्या सभासदांना स्वतः ऐवजी त्यांच्या प्रतिनिधीला सदर सभेला उपस्थित राहण्यासाठी व मतदान करण्यासाठी नियुक्त करण्याचा अधिकार आहे व तो प्रतिनिधी कंपनीचा सभासद असण्याची गरज नाही. कंपनी कायदा २०१३ च्या कलम ९१ तसेच नियम ४२ सेबी (नोंदणी कर्तव्ये आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम, २०१५ तरतूदीनुसार सभासद नोंदणी व कंपनी सभासद हस्तांतरण नोंदणी पुस्तके बुधवार २६ जुलै २०१७ ते बुधवार ०९ ऑगस्ट २०१७ (दोन्ही दिवस समाविष्ट) दरम्यान बंद राहील. २८वी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या विषयांचे संदर्भित कागदपत्रे नोंदणीकृत कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत तपासणी करीता (शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टी सोडून) वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत उपलब्ध आहेत.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ आणि कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम २०१४ च्या नियम २० आणि नियम ४४ सेबी (नोंदणी कर्तव्ये आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम, २०१५ आणि इन्स्टिटयूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेल्या सर्व साधारण सभेच्या सचिवीय मानकानुसार, कंपनी हि सभासदांना इलेक्ट्रोनिक पद्धतीने २८वी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मतदान करण्याची सुविधा सी.डी.ऐस.एल. द्वारे प्रदान करण्यात येणाऱ्या दूरस्थ ई-मतदानाद्वारे उपलब्ध करीत आहेत. सभेला उपस्थित राहणाऱ्या, आणि दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपले मतदान न केलेल्या सभासदांसाठी, कामकाज संबंधात मतदान पत्रिका अथवा स्थळ ई-मतदान याद्वारे आपले मतदान करण्याची सुद्धा व्यवस्था करण्यात आली आहे. सभेच्या आधी दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपले मतदान केलेले सभासद हे सभेला उपस्थित राहू शकतील परंतु ते पुन्हा मतदान करण्यासाठी हक्कदार असणार नाहीत.

ज्या सभासदांनी आपले ई-मेल पत्ते डिपॉझिटरीजकडे नोंदवले आहेत त्यांना इलेक्ट्रोनिक स्वरुपात तसेच ज्या सभासदांनी आपले ई-मेल पत्ते नोंदवले नाहीत किंवा छापील प्रतीची मागणी केली आहे, त्यांना सदर सूचना तसेच वार्षिक अहवालाच्या प्रती दिनांक १० जुलै २०१७ रोजी पाठविण्यात आले आहेत. तसेच हे दस्तावेज कंपनीच्या संकेतस्थळ www.sanghvicranes.com तसेच www.evotingindia.com येथे उपलब्ध आहेत.

वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठविल्यानंतर एखाद्या व्यक्तीने कंपनीचे भाग घेतले आणि डिपॉझिटरीजद्वारे बाळगण्यात येणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदणी वहीमध्ये ज्याचे नाव हे बुधवार ०२ ऑगस्ट २०१७ रोजी असेल त्यांनाच दूरस्थ ई-मतदान किंवा सर्वसाधारण सभेमध्ये मतदानाचा हक्क असेल. परंतु जर अशी व्यक्ती सी.डी.ऐस.एल. कडे दूरस्थ ई-मतदानासाठी पूर्वीच नोंदणीकृत असेल तर त्या व्यक्तीने वापरकर्ता ओळख व सांकेतिक शब्द (पासवर्ड) वापरून मतदान करावे. जर वापरकर्ता ओळख व सांकेतिक शब्द (पासवर्ड) विसरला असेल तर www.evotingindia.com या संकेतस्थळावर जावे व आपला वापरकर्ता ओळख व सांकेतिक शब्द (पासवर्ड) पुनःस्थापित करावा अथवा १८००२००५५३३ या मोफत दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

दूरस्थ ई-मतदानाचा कालावधी हा रविवार, ०६ ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजता सुरु होईल आणि मंगळवार, ०८ ऑगस्ट २०१७ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजता समाप्त होईल. ०८ ऑगस्ट २०१७ रोजी संध्याकाळी ५.०० नंतर दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया बंद होईल आणि सदर तारखेच्या आणि वेळेच्या नंतर सभासदांना मतदान करण्याची अनुमती असणार नाही.

मतदान प्रक्रिया न्याय आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात असल्याचे परीक्षण करण्यासाठी श्री विनायक खानवलकर, व्यावसायिक कंपनी सचिव, यांची परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

दूरस्थ ई-मतदानाच्या संबंधात कोणत्याही तक्रारी, प्रश्न किंवा मुद्दे असल्यास, सभासद हे वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि www.evotingindia.com मधील मदत सेवेचा संबंधात असलेल्या पुस्तीकाद्वारे निरसन करून घेऊ शकतील किंवा helpdesk.evoting@cdslindia.com, pune@linkintime.co.in येथे ई-मेल लिहू शकतील.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार,**
**संघवी मूव्हर्स लिमिटेड** करिता
**राजेश पां. लिखिते**
**कंपनी सचिव**
मे. क्र. एसीएस-१३१५१

स्थळ : पुणे
दिनांक : १० जुलै २०१७